बॅसीन कॅथॉलिक को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)

बॅसीन कॅथॉलिक को-ऑप. बँक लि. (शेड्युल्ड बँक)

कॅथॉलिक बँक बिल्डिंग, पापडी नाका, पापडी, वसई (पश्चिम), ता.वसई, जि. पालघर (एमएस) ४०१२०७
फोन क्र. : ०२५० २३२८३२६, ०२५० २३२२०५३, ७४४७७६२२११, ७७१९८७३४४४

विक्री सूचना

जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ च्या कलम १३ (४) नुसार प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कब्जात घेतलेली येथे वर्णन केलेली स्थावर मिळकत खाली दिलेल्या अटी आणि शर्तींवर सदर सूचनेत दिलेल्या तारीख, ठिकाण आणि वेळेस **''जे आहे जेथे आहे, जे आहे जसे आहे आणि विना हरकत तत्त्वावर''** जनतेकडून प्रस्ताव निमंत्रित करून विकण्यात येईल. खाली सविस्तर वर्णन केलेल्या मिळकतीच्या खरेदीकरिता जनतेकडून मोहोरबंद पाकिटातून प्रस्ताव निमंत्रित करण्यात येत आहेत.

अ. क्र.	कर्जदार (एनपीए) चे नाव	मागणी सूचनेनुसार थकीत रक्कम (रु.)	मिळकतीचे वर्णन	राखीव किंमत आणि इअर	लिलाव आणि निरीक्षणाची तारीख आणि वेळ
(१)	मे. मेडिहाईट्स हेल्थकेअर (पी) लि. आणि अन्य	४,४२,४३,३९९/-	असश्चन व्हु सीएचएस लि., एम. जी. रोड लगत, सेंट जोसेफ स्कूल समोर, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०० ०६७ येथे सी- विंग मध्ये सी/६ तळमजला आणि सी/१७ १ ला मजला आणि बी विंग मध्ये तळमजल्यावर नर्सिंग होम प्रिमायसेस क्र. बी/५, मोजमापित २२४१ चौ.फू. बिल्ट अप क्षेत्र	४,२५,००,०००/- (राखीव किंमत) आणि रु. ४२,५०,०००/- (इअर)	२४ मे, २०१९ रोजीस स. ११.०० वा. लिलाव १७ मे, २०१९ रोजीस स. ११ ते दु. १.०० वा. निरीक्षण
	मे. मेडिहाईट्स श्रीजी हेल्थकेअर हॉस्पिटल (पी) अन्य	१,७७,३६,६८५/-			
	एकूण	११,५४,९२,६९८/-			

(बी) तारण धनकोंचा पत्ता : बॅसीन कॅथॉलिक को-ऑप. बँक लि. (शेड्युल्ड बँक), कॅथॉलिक बँक बिल्डिंग, पापडी नाका, पापडी, वसई (पश्चिम), तालुका - वसई, जि. - पालघर (एम.एस.) ४०१२०७.

(सी) ज्याच्या वसूलीसाठी मिळकत विकावयाची आहे ते तारण कर्ज :- दिनांक ०१.०८.२०१३ रोजीच्या मागणी सूचनेनुसार **रु.११,५४,९२,६९८/-(रुपये अकरा करोड चोपन्न लाख ब्याण्णव हजार सहाशे अठ्ठ्याण्णव मात्र)** सह ०१/०८/२०१३ पासूनचे पुढील व्याज आणि अन्य आकार.

(डी) जनतेकडून प्राप्त झालेले प्रस्ताव उघडण्याची तारीख, वेळ आणि ठिकाण :- **२४/०५/२०१९ रोजी स. ११.०० वा. बॅसीन कॅथॉलिक बँक बिल्डिंग (शेड्युल्ड बँक), कॅथलिक बँक बिल्डिंग, पापडी नाका, पापडी, वसई (पश्चिम), ता. वसई, जि. पालघर. इच्छुक बोलीदारांनी त्यांचे मोहोरबंद प्रस्ताव दिनांक २४.०५.२०१९ रोजी स. १०.०० पर्यंत सादर करावेत.**

विक्रीच्या अटी आणि शर्ती :-

१) प्राधिकृत अधिकाऱ्यांना उद्देशून मोहोरबंद पाकिटातील प्रस्ताव, **''बॅसीन कॅथॉलिक को-ऑप. बँक लि., खाते - मे. मेडिहाईट्स श्रीजी हेल्थकेअर हॉस्पिटल्स प्रा. लि.''** च्या नावातील डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर स्वरुपातील **रु.४२,५०,०००/- (रुपये बेचाळीस लाख पन्नास हजार फक्त)** च्या इसारा अनामत रकमेसह **(इअर)** सह जोडून प्राधिकृत अधिकारी, बॅसीन कॅथॉलिक को-ऑप. बँक लि. (शेड्युल्ड बँक), मुख्यालय, कॅथॉलिक बँक बिल्डिंग, पापडी, ता. वसई, जि. पालघर (म.रा.)- ४०१२०७ यांचेकडे लिलावासाठी ठरवलेल्या वेळेच्या एक तास अगोदर सादर केले पाहिजेत. प्रस्ताव अर्ज हे प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे रु. २००/- च्या देयावर उपलब्ध आहेत.

२) प्रस्तावासोबत आधार कार्ड, पासपोर्ट, व्होटर्स आयडी, ड्रायव्हिंग लायसन्स, आयकर विभागाने जारी केलेले पॅन कार्ड किंवा बँकेकडून स्वीकारली जाईल अशा अन्य वैध छायाचित्र ओळख पुराव्याच्या स्वसाक्षांकित किंवा प्रतिसाक्षांकित प्रतिलाही जोडावे.

३) प्रस्ताव असलेल्या मोहोरबंद पाकिटावर ठळकपणे **'हॉस्पिटल मिळकतीच्या खरेदीकरिता'** असे लिहावे.

४) इअरशिवाय प्राप्त होणारे प्रस्ताव तडकाफडकी फेटाळण्यात येतील.

५) इअरसाठीचे डीडी/पीओ लिलावाच्या तारखेपर्यंत बदलता/रोख केला जाणार नाही आणि अयशस्वी प्रस्तावकर्त्यांना परत करण्यात येईल. इअर रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

६) विक्रीसाठीचे मोहोरबंद प्रस्ताव बँकेचे प्राधिकृत अधिकारी **२४/०५/२०१९ रोजी स. ११.०० वा. उपस्थित असलेल्या प्रस्तावकर्त्यांच्या उपस्थितीत उघडतील. प्राधिकृत अधिकारी** यांच्या मर्जीने बोली उघडल्यानंतर आपापसात बोली लावण्याची किंवा त्यांच्या स्वेच्छेप्रमाणे रकमेच्या पटीत रकम वाढविण्याची अनुमती प्रस्तावकर्त्यांना देऊ शकतील.

७) यशस्वी प्रस्तावकर्ते/बोलीदार यांनी बोली रकमेच्या २५% रकम (इअर धरून) त्याच्या/तिच्या नावे विक्री निश्चित झाल्यावर ताबडतोब जमा करावी लागेल. कसूर केल्यास इअर रकम जप्त होईल. उर्वरित बोली रकम (विक्री किंमत) विक्री निश्चितीच्या तारखेपासून १५ दिवसांत किंवा प्राधिकृत अधिकारी विनिर्दिष्ट करतील अशा अन्य कोणत्याही तारखेस जमा करावी लागेल.

८) जर विक्री निश्चितेच्या तारखेपासून १५ दिवसांत किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यांनी विनिर्दिष्ट केलेल्या अन्य कोणत्याही तारखेपर्यंत बोली रकमेची उर्वरित ७५% रकम प्रदान करण्यास यशस्वी प्रस्तावकर्ते/बोलीदार यांनी कसूर केल्यास त्याने/तिने जमा केलेली रकम जप्त केली जाईल आणि पुन्हा मिळकतीची विक्री करण्यास बँक मुक्त असेल. कसूरवार प्रस्तावकर्ते/बोलीदार यांना त्यांनी जमा केलेल्या रकमेवर आणि लिलाव केलेल्या मिळकतीवर कोणताही दावा करता येणार नाही.

९) यशस्वी प्रस्तावकर्ते/बोलीदार यांनी सर्व कायदेशीर/अनुषंगिक परिव्यय, जसे की मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, स्थानिक कर, को-ऑप सोसायटीची देयके, विज बिले, वैधानिक देणी, टीडीएस आणि/किंवा लिलाव केलेल्या मिळकतीशी निगडीत अन्य कोणतीही थकबाकी भरावी लागेल.

१०) विक्री तारण धनको/बँकेच्या मंजुरी अधीन राहील.

११) कोणतेही कारण न देता सर्व किंवा कोणतेही प्रस्ताव/बोली फेटाळण्याचे अधिकार प्राधिकृत अधिकारी राखून ठेवत आहेत आणि/किंवा मोहोरबंद प्रस्ताव उघडणे/पुढे ढकलण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार असतील.

१२) प्राधिकृत अधिकारी त्यांच्या मर्जीने पूर्वसूचनेशिवाय सदर सूचनेच्या कोणत्याही अटी आणि शर्तींमध्ये फेरफार करण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत.

१३) इच्छुक पक्षकार मिळकतीचे निरीक्षण **१७/०५/२०१९** रोजी स. **११.००** आणि दु. **१.००** दरम्यान करू शकतील.

१४) कोणत्याही पुढील तपशिलासाठी इच्छुक पक्षकार कोणत्याही कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत बॅसीन कॅथॉलिक को-ऑप. बँक लि. (शेड्युल्ड बँक), मुख्यालय, कॅथॉलिक बँक बिल्डिंग, पापडी, ता. वसई, जि. पालघर (म.रा.)- ४०१२०७. फोन क्र. ०२५०-२३२८३२६, ०२५० २३२२०५३, ७४४७७६२२११, ७७१९८७३४४४ आणि अन्य कोणत्याही तपशिलासाठी कोणत्याही कार्यकालीन दिवसात कार्यालयीन वेळेत येथे संपर्क साधू शकतात.

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्सच्या नियम (८) च्या पोट कलम (६) अन्वये कर्जदार/हमीदार यांना सुध्दा ही सूचना समजण्यात यावी.)

सही/-
प्राधिकृत अधिकारी
बॅसीन कॅथॉलिक को-ऑप. बँक लि. (शेड्युल्ड बँक)

दिनांक : ७ मे, २०१९
ठिकाण : वसई, पालघर